Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/भांडार/ 207 दिनांक :- 17 JAN 2026

**परीक्षा प्राधान्य/महत्वाचे**

प्रति,
सर्व केंद्रसंचालक/संबंधित परीक्षा केंद्राचे प्राचार्य/मुख्याध्यापक
उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु-मार्च २०२६
सातारा/ सांगली / कोल्हापूर.

विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) फेब्रु-मार्च २०२६ परीक्षेच्या उत्तरपत्रिका,पुरवणी, नकाशा, होलोक्राफ्ट स्टिकर्स व स्टेशनरी साहित्य हस्तपोच स्विकारणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, फेब्रु-मार्च २०२६ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या उत्तरपत्रिका, पुरवणी, नकाशा, होलोक्राफ्ट स्टिकर्स व स्टेशनरी इ. साहित्य दि. २१/०१/२०२६ ते दि. २९/०१/२०२६ या कालावधीत आपल्या परीक्षा केंद्रावर हस्तपोच देण्यात येणार आहे. तरी आपल्या केंद्रावर सकाळी ८.०० वाजल्यापासून मंडळाचा प्रतिनिधी येईपर्यंत आपण अथवा आपला प्रतिनिधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहील असे नियोजन करावे. सद्यस्थितीत केंद्रसंचालक नियुक्तीबाबत या कार्यालयामार्फत कार्यवाही सुरु असून परीक्षा केंद्रावर उपरोक्त नमूद साहित्य मंडळ प्रतिनिधी घेऊन आल्यास सदरचे साहित्य आपण स्विकारुन मंडळ प्रतिनिधीना पोहोच द्यावी व ज्या वेळी आपल्या केंद्रावर केंद्रसंचालक यांची नियुक्ती होईल त्यावेळी सदरचे साहित्य रितसर केंद्रसंचालक यांचेकडे देऊन पोहोच आपल्याकडे ठेवावी व एक प्रत मंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात यावी.

| अ.क्र. | रुट नंबर | रूटमार्ग तपशील | रुटचा दिनांक | |
|---|---|---|---|---|
| १ | ०२ | मुरगूड ते हुपरी | बुधवार | २१ /०१/ २०२६ |
| २ | ०६ | कराड ते खंडाळा बावडा | बुधवार | २१ /०१/ २०२६ |
| ३ | ०८ | रुकडी ते खरसुंडी | बुधवार | २१ /०१/ २०२६ |
| ४ | ०५ | रहिमतपूर ते वाठार स्टेशन | शुक्रवार | २३ /०१/ २०२६ |
| ५ | ०९ | पेठ वडगांव ते मायणी | शुक्रवार | २३ /०१/ २०२६ |
| ६ | १० | इस्लामपूर ते सातारा | शुक्रवार | २३ /०१/ २०२६ |
| ७ | ०१ | कोल्हापूर ते राधानगरी | मंगळवार | २७ /०१/ २०२६ |
| ८ | ०७ | इचलकरंजी ते सांगली | मंगळवार | २७ /०१/ २०२६ |
| ९ | ०३ | वारणानगर ते ऐतवडे बुद्रुक | मंगळवार | २७ /०१/ २०२६ |
| १० | ०४ | कोल्हापूर स्थानिक | गुरुवार | २९ /०१/ २०२६ |

**उपरोक्त प्रमाणे परीक्षा विषयक साहित्य परीक्षा केंद्रावर उतरवून घेणे अनिवार्य आहे. तसेच जे परीक्षा केंद्र/ माध्यमिक शाळा/ कनिठ महाविद्यालय सदरचे साहित्य उतरुन घेण्यास नकार देतील त्यांच्यावर मंडळ नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी. तसेच सर्व साहित्य प्राप्त होताच मोजून ताब्यात घ्यावे व पुरेसे असल्याची खात्री करावी. परीक्षेचे साहित्य कमी असल्यास तात्काळ भांडार शाखेशी संपर्क साधून ते उपलब्ध करून घेण्याची दक्षता घ्यावी.**

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.